महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.
दूरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

क्र.तंशिप्र-१२२६/प्र.क्र.०७/सीईटी/२०२६/२७५८ दिनांक - 4 SEP 2026

## जाहीर सूचना

**व्यावसायिक अभ्यासक्रम प्रवेश प्रक्रिया (सन २०२६-२७) - जात वैधता प्रमाणपत्र (Caste Validity Certificate) सादर करण्यासाठी मुदतवाढीबाबत.**

संदर्भ: सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन परिपत्रक क्रमांक: सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक, दिनांक ०४ सप्टेंबर, २०२६.

सर्व संबंधित विद्यार्थी आणि पालकांना याद्वारे सूचित करण्यात येते की, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी आमच्या संस्थेत **अभियांत्रिकी आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या** प्रवेश प्रक्रियेअंतर्गत ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित (Confirm) झालेले आहेत, अशा उमेदवारांसाठी शासनाने एक महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे.

अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत, परंतु सदर उमेदवारांपैकी काही उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात अडचणी येत आहेत, त्यांची गैरसोय टाळण्यासाठी शासन परिपत्रकानुसार पुढील ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे.

**महत्त्वाच्या अटी व नियम:**

- ३ महिन्यांची मुदतवाढ शासन परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून म्हणजेच दि. ०४.०९.२०२६ पासून लागू राहील.
- सदर ३ महिन्यांच्या मुदतीमध्ये संबंधित उमेदवाराने आपले मूळ जात वैधता प्रमाणपत्र कार्यालयात सादर करणे अनिवार्य/बंधनकारक राहील.
- शासनाने दिलेली ही ३ महिन्यांची मुदत ही अंतिम संधी असून, यानंतर कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ दिली जाणार नाही याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

निश्चित मुदतीत प्रमाणपत्र सादर न केल्यास शासन नियमांनुसार प्रवेशाबाबत होणाऱ्या संभाव्य कारवाईला विद्यार्थी स्वतः जबाबदार राहतील.

(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई

**सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रम शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरीता उमेदवारांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत...**

## महाराष्ट्र शासन

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक:- सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२.
दि.०४ सप्टेंबर, २०२६

## परिपत्रक

**<u>संदर्भ :-</u>** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय:- संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५ (भाग-१)/आरक्षण-५ दि.०२.०७.२०२६

राज्यात सध्या सुरू असलेल्या सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागसवर्ग (एसईबीसी) व इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत. त्यांना संदर्भाधिन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णयान्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकपासून सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

२. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत, परंतु सदर उमेदवारांपैकी काही उमेदवारांना जात वैधताप्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दि.०४.०९.२०२६ रोजीचे सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकपासून पुढील ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर ३ महिन्यांच्या मुदतीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३. विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास देण्यात आलेली ३ महिन्यांची मुदत हि अंतिम संधी असून त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०९०४१४३९१६७०२२ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे. सदरचे परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. ०२.०७.२०२६ मध्ये नमुद सर्व विभाग/ कार्यालयांना लागू राहिल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

DESHMUKH
VARSHA GUNVANT

Digitally signed by DESHMUKH VARSHA GUNVANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA,
2.5.4.20=318374474BDBBEE0A87FA98C6CE4ADDBC6F40C52596BC652C9C91F0A77A35550, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B030780A012E3648CB356030F4D4BFD6DCFED5E1526059A46C0B7A14FE3C29A0, cn=DESHMUKH VARSHA GUNVANT
Date: 2026.09.04 14:40:17 +05'30'

**(वर्षा देशमुख)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरीता उमेदवारांना सहा महिन्यांची मुदत देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक - संकिर्ण-२०२४/प्र.क्र. ७५ (भाग-१)/आरक्षण-५**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक - २ जुलै, २०२६

**संदर्भ-**

१. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६)
२. शासन निर्णय क्र.मआसु-२०२४/प्र.क्र.०३/१६-क, दि.०७.०९.२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.६८/आरक्षण-५, दि.२६.०८.२०२५

**प्रस्तावना -**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) व इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश निश्चित झालेले त्यांना संदर्भ क्र.३ अन्वये जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आलेली होती. त्याच धर्तीवर आता सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षाकरीता काही कालावधीची मुदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

राज्यात सध्या सुरू असलेल्या सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) व इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत, परंतू सदर विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी

लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात येत आहे. सदर सहा महिन्यांच्या मुदतीमध्ये संबंधित विद्यार्थ्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित विद्यार्थी जबाबदार राहतील.

२. विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास देण्यात आलेली ६ महिन्यांची मुदत ही अंतिम संधी असून त्यांनतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०७०२१६१२४५९८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by APPASO DHULAJ
Date: 2026.07.02 16:13:32 +05'30'

**( आप्पासो धुळाज )**
**सचिव (साविस) , महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य/संसद सदस्य
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.
१६) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

१८) महालेखापाल, महाराष्ट्र-१. मुंबई.
१९) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुबई
२१) मुख्य महानगर दंडाधिकारी,
२२) सर्व विभागीय आयुक्त.
२३) सर्व जिल्हाधिकारी,
२४) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,
२५) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
२६) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई
२७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, मुंबई.
२८) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ नागपूर.
२९) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, नागपूर,
३०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
३१) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
३२) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३३) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३४) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३५) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३६) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३७) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३८) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
३९) सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात,
४०) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
४१) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
४२) सर्व जिल्हा परिषदाचे समाजकल्याण अधिकारी
४३) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
४४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४५ निवड नस्ती, आरक्षण-५

# महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) कक्ष

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र उशिप्र-११२६/प्र.क्र.२५/कॅप-२६/**२१७७**/२०२६ दिनांक : **०४/०९/२०२६**

## <u>महत्त्वाची सूचना</u>

### सन २०२६-२७ शैक्षणिक वर्षातील केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेअंतर्गत प्रवेश घेतलेल्या उमेदवारांसाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास मुदतवाढ

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामध्ये विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी प्रवेश निश्चित झालेल्या सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC) व इतर मागासवर्ग (OBC) प्रवर्गातील उमेदवारांना, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्र. **संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५ (भाग-१)/आरक्षण-५, दिनांक ०२/०७/२०२६** अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी प्रवेशासाठी अर्ज केलेल्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आलेली आहे.

सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेच्या अनुषंगाने महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचेकडून शासन परिपत्रक क्र. **सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक**, दिनांक **०४/०९/२०२६** रोजी निर्गमित करण्यात आले आहे.

सदर शासन परिपत्रकानुसार, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षातील विविध व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश निश्चित झालेल्या अनुसूचित जाती (SC), विमुक्त जाती (VJ), भटक्या जमाती (NT) व विशेष मागास प्रवर्ग (SBC) तसेच संबंधित आरक्षित प्रवर्गातील ज्या उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, अशा उमेदवारांना महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या **शासन परिपत्रक क्र. सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक, दिनांक ०४/०९/२०२६** अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी **परिपत्रकाच्या दिनांकापासून पुढील ३ महिन्यांची मुदतवाढ** देण्यात आली आहे.

संबंधित उमेदवारांनी सदर मुदतीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करून ते संबंधित महाविद्यालय/शैक्षणिक संस्थेत सादर करणे बंधनकारक राहील. तसेच, संबंधित महाविद्यालयांनी उमेदवारांना सदर मुदतवाढीबाबत अवगत करून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्याची आवश्यक ती नोंद व पडताळणी करावी.

जात वैधता प्रमाणपत्र (CVC) प्राप्त करण्यासाठी अर्ज केलेला असून त्याची अर्जाची पावती सादर केलेल्या उमेदवारांना, सदर पावतीच्या आधारे दिलेला प्रवेश केवळ जात वैधता प्रमाणपत्र विहित मुदतीत सादर न केल्याच्या कारणास्तव रद्द करू नये. अशा उमेदवारांना **महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या शासन परिपत्रक क्र. सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक, दिनांक ०४/०९/२०२६** अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी देण्यात आलेल्या **३ महिन्यांच्या मुदतीचा लाभ** देण्यात यावा.

CAP Round-I, II व III मध्ये प्रवेश घेतलेल्या संबंधित उमेदवारांनी सदर मुदतीमध्ये जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. त्यामुळे, संबंधित महाविद्यालयांनी अशा उमेदवारांचे प्रवेश **सदर शासन परिपत्रकानुसार देण्यात आलेल्या मुदतीदरम्यान रद्द करू नयेत** व उमेदवारांकडून जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर त्याची आवश्यक ती नोंद व पडताळणी करावी.

**सही/-**
**आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी**
**महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,**
**मुंबई.**

**सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रम शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरीता उमेदवारांना तीन महिन्यांची मुदतवाढ देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांकः- सीबीसी-२०२५/प्र.क्र.१३१/मावक**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय (विस्तार), मुंबई-३२.
दि.०४ सप्टेंबर, २०२६

**परिपत्रक**

**<u>संदर्भ :-</u>** सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णयः- संकीर्ण-२०२४/प्र.क्र.७५ (भाग-१)/आरक्षण-५ दि.०२.०७.२०२६

राज्यात सध्या सुरू असलेल्या सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागसवर्ग (एसईबीसी) व इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत. त्यांना संदर्भाधिन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णयान्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकपासून सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

२. अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील ज्या उमेदवारांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत, परंतु सदर उमेदवारांपैकी काही उमेदवारांना जात वैधताप्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थामधील प्रवेशाकरिता (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दि.०४.०९.२०२६ रोजीचे सदर परिपत्रक निर्गमित झाल्याच्या दिनांकपासून पुढील ३ महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर ३ महिन्यांच्या मुदतीमध्ये संबंधित उमेदवाराने जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

३. विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास देण्यात आलेली ३ महिन्यांची मुदत हि अंतिम संधी असून त्यानंतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०२६०९०४१४३९१६७०२२ असा आहे. हे परिपत्रक डिजिटल स्वाक्षरीने सांक्षाकित करुन काढण्यात येत आहे. सदरचे परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि. ०२.०७.२०२६ मध्ये नमुद सर्व विभाग/ कार्यालयांना लागू राहिल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

DESHMUKH
VARSHA GUNVANT

Digitally signed by DESHMUKH VARSHA GUNVANT
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SJSA,
2.5.4.20=318374474BDBBEE0A87FA98C6CE4ADDBC6F40C52596BC652C9C91F0A77A35550, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=B030780A012E3648CB356030F4D4BFD6DCFED5E1526059A46C087A14FE3C29A0, cn=DESHMUKH VARSHA GUNVANT
Date: 2026.09.04 14:40:17 +05'30'

**(वर्षा देशमुख)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षासाठी अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांमधील शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्याकरीता उमेदवारांना सहा महिन्यांची मुदत देण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

**सामान्य प्रशासन विभाग**

**शासन निर्णय क्रमांक - संकिर्ण-२०२४/प्र.क्र. ७५ (भाग-१)/आरक्षण-५**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,

मंत्रालय, मुंबई-४०००३२

दिनांक - २ जुलै, २०२६

**संदर्भ-**

१. महाराष्ट्र राज्यातील सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्गांकरिता आरक्षण अधिनियम, २०२४ (सन २०२४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १६)
२. शासन निर्णय क्र.मआसु-२०२४/प्र.क्र.०३/१६-क, दि.०७.०९.२०२३
३. शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२५/प्र.क्र.६८/आरक्षण-५, दि.२६.०८.२०२५

**प्रस्तावना -**

सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) व इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे शैक्षणिक प्रवेश निश्चित झालेले त्यांना संदर्भ क्र.३ अन्वये जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात आलेली होती. त्याच धर्तीवर आता सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षाकरीता काही कालावधीची मुदत देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय-**

राज्यात सध्या सुरू असलेल्या सन २०२६-२०२७ या शैक्षणिक वर्षामधील विविध शैक्षणिक संस्थांमधील व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (एसईबीसी) व इतर मागास प्रवर्ग (ओबीसी) प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश निश्चित झालेले आहेत, परंतू सदर विद्यार्थ्यांपैकी काही विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास येत असलेल्या अडचणी

लक्षात घेऊन सदर शैक्षणिक संस्थांमधील प्रवेशासाठी (अभियांत्रिकी, वैद्यकीय आणि इतर व्यावसायिक अभ्यासक्रमांसहित) विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी, प्रवेशासाठी अर्ज केल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांची मुदत देण्यात येत आहे. सदर सहा महिन्यांच्या मुदतीमध्ये संबंधित विद्यार्थ्यांनी जातवैधता प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अन्यथा अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश रद्द होतील व त्याबाबत संबंधित विद्यार्थी जबाबदार राहतील.

२. विद्यार्थ्यांना जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यास देण्यात आलेली ६ महिन्यांची मुदत ही अंतिम संधी असून त्यांनतर कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेतांक २०२६०७०२१६१२४५९८०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Digitally signed by APPASO DHULAJ
Date: 2026.07.02 16:13:32 +05'30'

( आप्पासो धुळाज )
**सचिव (साविस) , महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) राज्यपाल यांचे प्रधान सचिव,राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अ.मु.स./प्र.स./सचिव,मंत्रालय, मुंबई.
३) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
४) मा.विरोधी पक्ष नेता, विधानसभा, विधानभवन, मुंबई
५) मा. विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
६) सर्व विधानसभा/विधानपरिषद सदस्य/संसद सदस्य
७) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८) अपर मुख्य सचिव (सेवा),सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०)अपर मुख्य सचिव, कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई.
१४) प्रधान सचिव, इतर मागास व बहुजन कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१५) सचिव, वैद्यकीय शिक्षण वऔषधी द्रव्ये विभाग, जी.टी. हॉस्पिटल, मुंबई.
१६) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-
१७) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.

१८) महालेखापाल, महाराष्ट्र-१. मुंबई.
१९) महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
२०) अधिदान व लेखा अधिकारी, मुबई
२१) मुख्य महानगर दंडाधिकारी,
२२) सर्व विभागीय आयुक्त.
२३) सर्व जिल्हाधिकारी,
२४) सर्व उप विभागीय दंडाधिकारी (महसूल) तथा उप विभागीय अधिकारी,
२५) सर्व तालुका कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार,
२६) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, मुंबई
२७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, मुंबई.
२८) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ नागपूर.
२९) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, नागपूर,
३०) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय शाखा, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
३१) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्याय अपील शाखा, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर,
३२) आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३३) महासंचालक, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे
३४) संचालक, विजाभज संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
३५) संचालक, उच्च तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३६) संचालक, माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३७) संचालक, प्राथमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
३८) सदस्य सचिव, राज्य मागासवर्ग आयोग, पुणे,
३९) सर्व मंत्रालयीन विभाग त्यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख/कार्यालय प्रमुख यांना याबाबतच्या सूचना द्याव्यात,
४०) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग/सर्व सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण
४१) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
४२) सर्व जिल्हा परिषदाचे समाजकल्याण अधिकारी
४३) सर्व अध्यक्ष/सदस्य सचिव, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
४४) महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई.
४५ निवड नस्ती, आरक्षण-५